No. of Printed Pages : 4

**एफ.एम.टी.-01**

# BDP / BCA / BTS

# मराठी भाषेचा अधिष्ठान अभ्यासक्रम

## सत्रांत परीक्षा

00355

## जून, 2018

## पाठ्यक्रम कोड : एफ.एम.टी.-01

*वेळ : दोन तास* *अधिकतम गुण : 50*

---

***सूचना : सर्व** प्रश्न सोडवणे आवश्यक आहेत.*

---

**1.** खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर निबंध लिहा : *10*

(a) स्वच्छ भारत अभियान

(b) भ्रष्टाचार मुक्तीची गरज

(c) मला आवडलेला प्रवास

(d) माझा आवडता लेखक

**2.** खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा : *8*

(a) तुकाराम महाराजांनी साधू कसा ओळखावा, हे कसे स्पष्ट केले आहे ?

(b) केशवसुत स्वत:ला 'देवाचे लाडके' असे का म्हणतात ?

(c) मर्ढेकरांच्या कवितेतील उपमेय-उपमानांचे वर्णन करा.

(d) कातरवेळी अक्काची मन:स्थिती कशी झाली, ते सांगा.

**3.** खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची उत्तरे लिहा : 6

(a) तात्याच्या तांब्याच्या अंगठीची घटना, त्याच्या आणि त्याच्या कारभारणीच्या मनातील कोणकोणते भाव सूचित करते ?

(b) प्रल्हाद बहिणीच्या घरी न जाता मरीआईच्या देवळात का थांबत असे ?

(c) आकाशाशी नाते जोडल्यावर लेखकाला कोणता अनुभव येतो ?

(d) 'कुंजाला सौंदर्य नष्ट करण्यापेक्षा ते निर्माण करण्यात पुरुषार्थ वाटतो' या विधानाचे स्पष्टीकरण करा.

**4.** खालीलपैकी कोणत्याही ***एका*** प्रश्नाचे उत्तर लिहा : 6

(a) 'गुंड्याभाऊचे दुखणे' ही कथा डॉक्टरांच्या दुष्ट चक्रात सापडलेल्या एका निरोगी रोग्याची कशी आहे, ते सांगा.

(b) ललित वाङ्मयाच्या वाचनाने एक प्रकारचा आनंद का होतो ?

(c) डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असलेली सामाजिक लोकशाही म्हणजे काय, ते स्पष्ट करा.

(d) लोकशाहीत न्यायालयांचे महत्त्व कोणते ?

**5.** मराठीतील शब्दांचे आठ प्रकार सांगून सर्वनाम आणि क्रियापद यांचे एक-एक उदाहरण वाक्यात वापर करून लिहा. 5

**किंवा**

खालीलपैकी ***एका*** कल्पनेचा सुमारे सहा ते आठ ओळींत विस्तार करा :

(a) जुने जाऊ द्या मरणालागुनि

(b) विद्या विनयेन शोभते

(c) प्रयत्नांती परमेश्वर

6. खालीलपैकी कोणत्याही ***तीन*** वाक्प्रचारांचा अर्थ सांगा : *3*

(a) अर्ध्या हळकुंडाने पिवळे होणे

(b) धाबे दणाणणे

(c) हकालपट्टी करणे

(d) हस्तक्षेप करणे

(e) तोंडचे पाणी पळणे

**किंवा**

खालीलपैकी कोणत्याही ***तीन*** म्हणींचा अर्थ स्पष्ट करा :

(a) चोराच्या मनात चांदणे

(b) नाकापेक्षा मोती जड

(c) हातच्या काकणाला आरसा कशाला

(d) देव तारी त्याला कोण मारी

(e) बळी तो कान पिळी

7. खालीलपैकी कोणत्याही ***एका*** प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहा : *4*

(a) भाऊराव पाटिलांनी स्वावलंबी शिक्षणाचा आग्रह धरून तो कृतीत कसा आणला ?

(b) स्त्रियांच्या विकासासाठी कोणते कार्यक्रम राबविले पाहिजेत ?

(c) विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतिमुळे मानवजातिसमोर कोणती आव्हाने उभी राहिली आहेत ?

(d) पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्याची गरज का आहे ?

8. खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा : *4*

From the beginning of its known history, India has been a primarily agricultural society. The people of the Vedic civilization farmed their lands and raised their cattle. Seasons were regular and predictable. The Indus valley, the valley of the Ganga and Yamuna rivers, and the foothills of the Himalayas provided ideal land for farming. Those who lived deeper in the mountains and jungles earned their livelihood from hunting and gathering fruits and nuts.

9. खालील उताऱ्याचा सारांश लिहा : *4*

मनाला केवळ आनंद देणे किंवा मनाचे निव्वळ रंजन करणे हाच कलेचा हेतू आहे, असे म्हणणाऱ्या माणसांची कीव करावीशी वाटते. सुंदर चित्र पाहिल्याने, मधुर गायन ऐकल्याने किंवा उत्कृष्ट मूर्ति पाहिल्याने आपल्याला आनंद तर होतोच होतो; पण त्यामुळे आपली जीवनशक्ती अधिक समृद्ध होते. भावनांचा विकास होतो आणि बुद्धिची उत्क्रांती होते. कलेच्या आस्वादाने आपण अधिक सुखी, अधिक तृप्त आणि अधिक उन्नत होतो. म्हणूनच समाजाच्या आनंदासाठी, प्रगतीसाठी आणि उद्धारासाठी कलेची आणि कलावंतांची गरज आहे. हजारो वर्षांच्या काळात मानवजातिने प्रगतीचा आणि संस्कृतीचा जो टप्पा आज गाठलेला आहे, त्याच्या श्रेयाचा मोठा वाटा कलावंतांनाच द्यायला पाहिजे. कलावंतांच्या पावलांनी समाज चालत असतो, कलावंतांच्या डोळ्यांनी समाज पहात असतो आणि कलावंतांच्या बुद्धिने समाज विचार करीत असतो. कलावंतांची कला ही समाजासाठी आहे आणि कलावंतांवाचून समाज हा सर्वस्वी रूक्ष आणि असहाय आहे.

---